महाराजा सयाजीराव ज्ञानमाला : २५

# महाराजा सयाजीराव स्त्रीविषयक कार्य

## शिवानी घोंगडे



महाराजा सयाजीराव गायकवाड संशोधन व प्रशिक्षण संस्था,
११५ म. गांधीनगर, औरंगाबाद - ४३१००५ मो. : ९८८१७४५६०४
Email : sayajiraogsps@gmail.com / www.sayajiraogaekwad.com

महाराजा सयाजीराव ज्ञानमाला : २५

# महाराजा सयाजीराव स्त्रीविषयक कार्य

शिवानी घोंगडे

महाराजा सयाजीराव संशोधन संस्था

महाराजा सयाजीराव
स्त्रीविषयक कार्य
इतिहास
शिवानी घोंगडे
●
प्रकाशन क्रमांक - ४५
पहिली आवृती - २०२१
●
प्रकाशक
बाबा भांड
सचिव
महाराजा सयाजीराव गायकवाड
संशोधन-प्रशिक्षण संस्था
११५, म. गांधीनगर
औरंगाबाद - ४३१ ००५
Email : baba.bhand@gmail.com
sayajiraogsps@gmail.com
संपर्क : (०२४०) २३३२६९२
९८८१७४५६०४

महाराजा सयाजीराव ज्ञानमाला : ई-बुक
संपादक : दिनेश पाटील
●
लेखक : शिवानी घोंगडे,
सकटे गल्ली, मोहरे,
ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर
- ४१६११४
मो. ८०१०४४७७४०
●
मुद्रक : प्रिंटवेल इंटरनॅशनल प्रा.लि.
जी-१२, एमआयडीसी,
चिकलठाणा, औरंगाबाद
●
मुखपृष्ठ : महेश मोधे
●
वितरक : साकेत प्रकाशन प्रा. लि.
औरंगाबाद
●
किंमत : ३० रुपये

---

● मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम, १९५० अन्वये
संस्था नोंदणी क्र. एफ - २४५९६ (औ) दि. १-१२-२०१६
● या संशोधन-प्रकाशन प्रकल्पास दिलेली देणगी प्राप्तिकर कायद्याच्या
कलम ८०जी अंतर्गत सवलतीस पात्र
● **12AA Reg.No - ITBA/EXM/S/12AA/2018-19/ 101507596(1) - 14-02-2019**
● **80 G Reg. No - ITBA/EXM/S/80G/2019-20/ 1018507877(1) - 30-09-2019**

# महाराजा सयाजीराव ज्ञानमाला निर्मितीमागील भूमिका



महाराजा सयाजीराव गायकवाड हे फक्त आधुनिक भारतातील सगळ्यात प्रागतिक राजे होते असे नाही तर भारतासारख्या बहुसांस्कृतिक देशाचे 'बौद्धिक नेतृत्व'च ते करत होते. धर्म, जात, तत्त्वज्ञान, शिक्षण, दातृत्त्व, संशोधन, शेती, उद्योग, आरोग्य, क्रीडा, साहित्य, संस्कृती, ललित कला, प्राच्यविद्या, पुरातत्त्व, आंतरराष्ट्रीय संबंध, स्वातंत्र्यलढा इ. मानवी समाजाच्या सर्व अंगांना कवेत घेणाऱ्या क्षेत्रात त्यांनी निर्माण केलेले मानदंड आजही भारतासाठी आदर्श आहेत. त्यामुळे ते आधुनिक भारताचे निर्माते आणि म्हणूनच खरेखुरे 'महानायक' सुद्धा आहेत.

महापुरुषांचे चिंतन हे फक्त इतिहासाच्या स्वप्नरंजनासाठी किंवा इतिहासाचा पोकळ अभिमान बाळगण्यासाठी करायचे नसते. आपल्या समकालीन जगण्यातील समस्यांची उत्तरे शोधण्यासाठी, आपला जीवनसंघर्ष सकारात्मक करण्यासाठीसुद्धा या महापुरुषांचे पुनर्वाचन आवश्यक असते. इतिहास जितका वस्तुनिष्ठपणे आपण वर्तमानाशी जोडू तितका आपल्या समाजाचा भविष्यवेध आपल्याला अचूकपणे घेता येईल.

महाराजा सयाजीरावांचा 'उदोउदो' करण्यासाठी महाराजा सयाजीराव ज्ञानमालेची निर्मिती केलेली नाही. आजच्या आपल्या धार्मिक आणि जातीय संघर्षावर, शेती-उद्योगातील संकटांवर मात करण्यासाठी तसेच समाज म्हणून आपल्यातील 'विसंवाद' कमी करून 'सुसंवाद' वाढवण्याच्या व्यापक भूमिकेतून ही महाराजा सयाजीराव ज्ञानमाला आकाराला आली. या निमित्ताने आपला तुटलेला इतिहास 'जोडून' वाचण्याची आणि त्यातून संवादाचे पूल उभारण्याची प्रेरणा सर्वांना मिळेल एवढे मात्र नक्की.

पहिल्या टप्प्यात साठ ई-बुक झाले आहेत.

**दिनेश पाटील**
संपादक
**महाराजा सयाजीराव**
**ज्ञानमाला ई बुक प्रकल्प**

**बाबा भांड**
सचिव
**महाराजा सयाजीराव गायकवाड**
**सं. आणि प्र. संस्था, औरंगाबाद**

●●●



# महाराजा सयाजीराव स्त्रीविषयक कार्य

भारतीय समाजक्रांतीचे जनक महात्मा फुले यांना आपण भारतीय स्त्री मुक्तीचे अग्रदूत मानतो. त्यांनी १८४८ मध्ये मुलींसाठी शाळा सुरू केली. फुले हे मुलींची शाळा सुरू करणारे पहिले भारतीय असल्याचे विचारात घेऊन त्यांना स्त्री मुक्तीचे अग्रदूत म्हटले जाते. त्याचप्रमाणे जात आणि स्त्री-दास्य यांची सांगड घालणारे आधुनिक भारतातील पहिले तत्त्वज्ञ म्हणूनदेखील अग्रपूजेचा मान फुलेंना जातो. परंतु आधुनिक भारताबरोबरच पुरोगामी महाराष्ट्र या क्षेत्रातील सयाजीरावांच्या क्रांती कार्याबाबत पूर्णतः अंधारात आहे.

स्वातंत्र्यानंतरच्या काळात १९७० नंतर भारतात गतिमान झालेल्या स्त्रीमुक्ती चळवळीने सयाजीरावांच्या कार्यातून प्रेरणा आणि त्यांचा स्त्रीमुक्तीचा कृतीकार्यक्रम तयार करण्यासाठी खात्रीशीरपणे उपयुक्त ठरणारे संदर्भ वेळीच स्वीकारले असते तर आजची एकारलेली आणि पराभूत अवस्था तिला टाळता आली असती. यासाठी बडोद्यातील कायदे असोत, शिक्षण

असो किंवा स्त्री विकासाचे उपक्रम असोत यातील संतुलित दृष्टी अधिक फलदायी ठरली असती; परंतु आपल्याकडे पुरोगामी चळवळींचा अभ्यास करत असताना स्वीकारला गेलेला दृष्टिकोन याला मारक ठरला. ही चर्चा टोकाची व्यक्तिकेंद्रितता आणि नकारात्मकता, पुरुष द्वेष आणि व्यवस्थेवरील टीकेतच सीमित झाली. याचे उत्तम उदाहरण म्हणजे सीमॉन द बुआर आणि इतर पाश्चात्य जहाल स्त्रीवाद्यांचे अंधानुकरण यात भारतीय स्त्रीवाद फसला हे आहे.

ताराबाई शिंदेंचा व्यवस्थेविरुद्धचा राग प्रतीक्रियेच्या स्वरूपात व्यक्त करणारा 'स्त्री-पुरुष तुलना' हा निबंध, जरी स्त्रीमुक्ती चळवळीला प्रेरणा देणारा असला तरी समग्र स्त्री पुरुष समानतेचा कार्यक्रम मात्र देऊ शकत नाही. या सर्व स्त्रीवादी विचारधारांची सयाजीरावांच्या स्त्रीविषयक दृष्टिकोनाच्या कृतिकार्यक्रम तुलना आवश्यक ठरते. कारण अशी तुलना केली असता विषमतावादावरील प्रतिक्रियेतून बाहेर येऊन विषमतेचा प्रतिकार करणारा सकारात्मक कार्यक्रम भारत पातळीवर फक्त सयाजीरावांच्या कामातूनच मिळतो हे सिद्ध होते.

## प्राथमिक शिक्षण

सयाजीरावांनी आपल्या प्रजेला साक्षर करण्याच्या उद्देशाने १८८२ मध्ये अस्पृश्य व आदिवासींना मोफत प्राथमिक शिक्षण देण्याचा हुकूम दिला. १८९३ मध्ये अमरेली तालुक्यातील १० गावांमध्ये सक्तीच्या व मोफत प्राथमिक शिक्षण कायद्याची

प्रायोगिक तत्त्वावर अंमलबजावणी केली. १८९३ मध्येच शाळेच्या एका मैलाच्या परिघात राहणाऱ्या ७ ते १० वर्षे या दरम्यानच्या सर्व मुलींना शाळेत येणे सक्तीचे करण्यात आले. खासगी शिक्षण घेणाऱ्या, निश्चित केलेली विशिष्ट इयत्ता उत्तीर्ण झालेल्या किंवा काही अपरिहार्य कारण असलेल्या विद्यार्थिनींना यामधून सूट देण्यात आली. सयाजीरावांनी आपल्या अधिकाऱ्यांना पडदा पद्धत पाळणाऱ्या कुटुंबातील मुलींवर शाळेत येण्याची सक्ती न करण्याचे आदेश दिले. ही सूट देतानाच शाळेतील अभ्यासक्रमाप्रमाणे या मुलींना शिक्षण देण्याची जबाबदारी महाराजांनी मुलींच्या पालकांवर सोपवली.

१८९३ च्या कायद्यात येणाऱ्या अडचणींवर उपाय काढत महाराजांनी १९०६ मध्ये संपूर्ण बडोदा संस्थानात सर्व जाती-धर्माच्या मुलामुलींसाठी मोफत व सक्तीचे प्राथमिक शिक्षण कायदा लागू केला. असा कायदा करणारे बडोदा हे भारतातील पहिले संस्थान आहे. इतकेच काय ब्रिटिश भारतातही हा कायदा होऊ शकला नाही. सयाजीरावांचे अनुकरण करत पुढे १९१८ मध्ये शाहू महाराजांनी प्रथम कोल्हापूर शहर आणि लगेचच संपूर्ण संस्थानात मोफत आणि सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाचा कायदा लागू केला. दुर्दैवाने आर्थिक व अन्य काही अडचणींमुळे शाहू महाराजांना कोल्हापुरातील हा कायदा फक्त मुलांपुरताच मर्यादित ठेवावा लागला.

यासंदर्भात रमेश जाधव महत्त्वाचे निरीक्षण नोंदवतात. ते म्हणतात, “मुलांच्या सक्तीच्या आणि मोफत प्राथमिक शिक्षणावर शाहू छत्रपतींनी जितके लक्ष केंद्रित केले होते तितके लक्ष त्यांनी मुलींच्या शिक्षणावर केंद्रित केल्याचे दिसत नाही. मोफत आणि सक्तीच्या प्राथमिक शिक्षण कायद्यातून मुलींना वगळण्यात आले होते.” रमेश जाधवांचे हे निरीक्षण शाहू महाराजांचे आदर्श असणारे सयाजीराव यांच्या कामाशी तुलना करून विचारात घेतले असता शाहू महाराजांनी सयाजीरावांना आदर्श म्हणून का स्वीकारले होते याचे उत्तर मिळते.

१८७५ मध्ये सयाजीरावांच्या राज्यारोहणावेळी बडोद्यात केवळ दोन कन्या शाळा कार्यरत होत्या. तर १९२६-२७ साली कन्या शाळांची संख्या ३७५ इतकी झाली. १८८९-९० मध्ये या शाळांमध्ये ३,४१५ विद्यार्थिनी शिक्षण घेत होत्या. तर १९३३ अखेर या शाळांमध्ये सुमारे ९०,००० विद्यार्थिनी शिकत होत्या. मुलींच्या प्रमुख शाळांमध्ये मूळ विषयांच्या बरोबरीने भरतकाम, चित्रकला, संगीत, पाकशास्त्र, संस्कृत इ. विषयांचे शिक्षण देण्यासाठी खास शिक्षकांची नियुक्ती करण्यात आली. १९२५-२६ मध्ये मुलींच्या दहा शाळेत शारीरिक प्रशिक्षणाचा अभ्यासक्रम सुरू करण्यात आला. यासाठी बालविवाह प्रतिबंधक कायद्याचा भंग करणाऱ्याकडून जमा झालेल्या दंडातून प्रतिमहिना १५० रु. रक्कम मंजूर करण्यात आली.

महाराजांनी समाजातील सर्व जाती जमातींमधील स्त्रियांच्या शिक्षणाकडे लक्ष दिले. १८९१ मध्ये अस्पृश्य मुलींसाठी स्वतंत्र शाळेची स्थापना करून शाळेच्या प्रमुखपदी अस्पृश्य महिलेची नियुक्ती केली. या शाळेत मुलींना फक्त शिष्यवृत्तीच नव्हे तर कपडे, निवास, भोजन व इतर जीवनावश्यक बाबी मोफत दिल्या जात होत्या. सयाजीरावांनी आदिवासी मुलींसाठी सोनगड येथे १८९६ ला पहिली मोफत निवासी शाळा सुरू केली. १९४१-४२ मध्ये या निवासी शाळेतल्या मुलींची संख्या ६२ इतकी होती. मुस्लिम समाजातील मुलींसाठी सयाजीरावांनी अनेक उर्दू शाळा स्थापन केल्या. १९४१-४२ मध्ये उर्दू शाळांमध्ये २,८०० मुली शिक्षण घेत होत्या.

मोफत व सक्तीचे प्राथमिक शिक्षण कायदा लागू झाला त्याचवर्षी म्हणजेच १९०६ मध्ये १,३४१ शाळांमध्ये एकूण ९९,७६८ मुले शिकत होती. तर १९३९-४० मध्ये या शाळांची संख्या २,२९४ पर्यंत वाढली. तर या शाळांमध्ये २,६१,८५७ विद्यार्थी शिक्षण घेत होते. यापैकी १,५२,४७१ मुले तर १,०९,३८६ मुली होत्या. अशा तऱ्हेने संस्थानातील स्त्रियांना प्राथमिक शिक्षण देण्यासाठीच्या महाराजांच्या प्रयत्नांना लक्षणीय यश मिळाले.

## माध्यमिक शिक्षण

महाराणी हायस्कूल ही बडोद्यातील मुलींसाठी असलेली पहिली माध्यमिक शाळा होती. १९३८-३९ मध्ये महाराणी हायस्कूलमध्ये ९७२ मुली शिकत होत्या. या शाळेव्यतिरिक्त

१९४०-४१ मध्ये बडोद्यात मुलींसाठीच्या चार अँग्लो-व्हर्नाक्युलर शाळा कार्यरत होत्या. याचवर्षी बडोदा संस्थानातील माध्यमिक शाळेत शिकणाऱ्या मुलींची संख्या २,९५९ होती. प्राथमिक आणि माध्यमिक शाळेत शिक्षण घेण्याची इच्छा असणाऱ्या मुलींना बडोदा सरकारकडून सढळ हाताने शिष्यवृत्ती देण्यात येत असे. बालविवाह प्रतिबंधक कायदा मोडणाऱ्यांकडून घेण्यात येणारी दंड स्वरूपातील रक्कम प्राथमिक शाळेतील मुलींना शिष्यवृत्ती देण्यासाठी वापरली जाई.

बडोद्यात उच्च शिक्षणाच्या व्यवस्थेसाठी सयाजीरावांनी १८८२ मध्ये बडोदा कॉलेजची स्थापना केली. १९३५ मध्ये बडोदा कॉलेजमध्ये १,०९७ विद्यार्थी शिक्षण घेत होते. त्यापैकी ३३ विद्यार्थिनी पदव्युत्तर व ४८ विद्यार्थिनी पदवीचे शिक्षण घेत होत्या. सर्वसामान्य लोकांना आपल्या मुलींना उच्च शिक्षण देण्याची प्रेरणा मिळावी म्हणून सयाजीरावांनी आपली कन्या इंदिराराजे यांना उच्च शिक्षणासाठी बडोदा कॉलेजमध्ये पाठविले.

जेव्हा पुरुषांना शिक्षणासाठी परदेशात पाठवण्याची बाब दुर्मिळ होती तेव्हा सयाजीरावांनी महिलांना शिक्षण घेण्यासाठी परदेशात पाठविले. सयाजीरावांनी मिस राधाबाई पोवार यांना अध्यापनशास्त्राचे शिक्षण घेण्यासाठी १९१४-१५ मध्ये अमेरिकेच्या टीचर्स कॉलेजमध्ये पाठविले व दोन वर्षासाठी वार्षिक १५० रु. वेतन दिले. १९१७-१८ मध्ये स्नेहलता पगार यांना बालसंगोपनशास्त्रातील उच्च शिक्षणासाठी सरकारी खर्चाने

अमेरिकेला पाठविण्यात आले. टी. सी. गजदार यांना 'बालवाडी व बालमानसशास्त्र' या विषयाच्या उच्च शिक्षणासाठी लंडनला पाठविले. भारताच्या सामाजिक आणि शैक्षणिक क्षेत्रात महत्त्वपूर्ण भूमिका बजावणाऱ्या हंसा मेहता यांनाही उच्च शिक्षणासाठी सयाजीरावांनी आर्थिक मदत केली होती.

## फिमेल ट्रेनिंग कॉलेज

मुलींच्या शाळांतील स्त्रीशिक्षिकांची गरज भागविण्यासाठी प्रशिक्षित स्त्रीशिक्षिका तयार करण्याच्या हेतूने १८८२ मध्ये फिमेल ट्रेनिंग कॉलेजची स्थापना करण्यात आली. १९०९ साली या कॉलेजमध्ये बडोदा प्रांताबाहेरील विद्यार्थिनींसाठी स्वतंत्र वसतिगृह स्थापन केले. १९३०-३१ ला फिमेल ट्रेनिंग कॉलेजमध्ये ५६७ विद्यार्थिनी शिक्षण घेत होत्या. १९३० मध्ये महाराजांनी या कॉलेजला ३०,००० रुपये निधी दिला होता. आजच्या रुपयाच्या मूल्यात ही रक्कम ७ कोटी ९७ लाख रुपयांहून अधिक भरते. १८८२ ला जेव्हा फुले हंटर आयोगाकडे स्त्रियांसाठी प्राथमिक शिक्षणाचा हक्क मागत होते त्याचवर्षी सयाजीरावांनी बडोद्यामध्ये स्त्रीशिक्षिका तयार करण्यासाठी स्त्रियांचे शिक्षणशास्त्र महाविद्यालय सुरू केले. या एकाच उदाहरणावरून सयाजीरावांची 'झेप' फुले विचाराच्या अनुकरणाबरोबर फुलेंच्याही पुढे पाऊल टाकणारी होती हे स्पष्ट होते.

भारतातील पहिल्या महिला शिक्षिकेचा मान असणाऱ्या सावित्रीबाईंना १८९० मध्ये महात्मा फुलेंच्या मृत्यूनंतर सयाजीरावांनी महिन्याला ५० रु. पेन्शन सुरू केली. फुल्यांचे दत्तक पुत्र यशवंत महाराजांच्या या मदतीमुळेच डॉक्टर होऊ शकले. १८९२ मध्ये सावित्रीबाईंचा भाषणसंग्रह बडोदा वत्सल प्रेसने प्रकाशित केला होता. पडदा पद्धतीमुळे ज्या मुली किंवा स्त्रिया सर्वसामान्य शाळांत जाऊन शिक्षण घेऊ शकत नव्हत्या व सक्तीच्या शिक्षण योजनेअंतर्गत येणाऱ्या वयोमर्यादेपेक्षा ज्यांचे वय जास्त होते अशा स्त्रियांपर्यंत शिक्षण पोहोचून त्या बौद्धिक आणि मानसिकदृष्ट्या सक्षम व्हाव्यात यासाठी ठिकठिकाणी झनाना वर्ग सुरू करण्यात आले. विशेष बाब म्हणजे चाळीस वर्षापेक्षा जास्त वय असणाऱ्या स्त्रियांनाही या वर्गात प्रवेश दिला जात असे.

## महिलांसाठी ग्रंथालये

महिलांना केवळ साक्षर करून न थांबता त्यांचा वैचारिक विकास करण्यासाठी सयाजीरावांनी बडोद्यात ग्रंथालय चळवळ सुरू केली. १९०७ साली महिला ग्रंथालय स्थापन करून महिला ग्रंथपालाची नेमणूक करण्यात आली. हा संपूर्ण भारतातील पहिला प्रयोग होता. १९१२ पासून या ग्रंथालयाने फिरत्या ग्रंथालयाच्या पुरस्कारासह महिला ग्रंथपालांनी शहरातील विविध महिलांशी संपर्क साधण्यास सुरुवात केली. १९१७-१८ मध्ये महिला ग्रंथालयातील पुस्तकांच्या देवाणघेवाणीची संख्या

९५५ वरून ९,३०३ पर्यंत वाढली. महात्मा फुलेंनी स्त्रियांना अज्ञानाच्या अंधारातून बाहेर काढण्यासाठी मुलींची शाळा सुरू केली तर येथेही सयाजीरावांनी फुलेंच्या पुढे जाऊन मुलींच्या शाळेबरोबरच मुलींसाठी ग्रंथालय स्थापन करून स्त्रियांना केवळ साक्षर नव्हे तर 'ज्ञानी' बनविले.

स्त्रियांच्या संदर्भातील अनेक महत्त्वाचे आणि पहिले ग्रंथ सयाजीरावांनी प्रकाशित केले. भानुसुखराम निर्गुणराम मेहता यांनी मीराबाईंच्या जीवनचरित्राचा परिचय करून देणारे 'मीराबाई' नावाचे गुजराथी भाषेतील पुस्तक लिहिले. पुढे १९१३ मध्ये दाजी नागेश आपटे यांनी या पुस्तकाचे मराठी भाषांतर केले. विनायक सदाशिव वाकसकर, यांनी १९२५ मध्ये आपल्या 'अप्रसिद्ध ऐतिहासिक चरित्रे' या पुस्तकामध्ये अहिल्याबाई होळकर यांचे चरित्र लिहिले आहे. १९४० मध्ये कमलाबाई टिळक यांनी स्त्रियांच्या जीवनातील प्रश्नांवर भाष्य करणारे 'स्त्री-जीवनविषयक काही प्रश्न' हे पुस्तक लिहिले. त्याचबरोबर 'बालिका ज्ञान मालेतून' मुलींसाठीची विविध पाठ्यपुस्तके प्रकाशित करण्यात आली. तर भारतीय संगीतावरील एकूण १५ ग्रंथांपैकी काही ग्रंथ विशेषतः मुलींसाठी तयार करून 'बालिका संगीत मालेतून' प्रसिद्ध करण्यात आले. सयाजीरावांनी स्त्रियांसंबंधी ग्रंथ निर्मिती करून स्त्रियांना असणारे महत्त्व अधोरेखित केले.

## संगीत शाळा

आपल्या प्रजेला सर्व क्षेत्रातील शिक्षण देण्याच्या हेतूने सयाजीरावांनी १८८६ साली उस्ताद मौलाबक्ष यांच्या मार्गदर्शनाखाली बडोद्यात म्युझिक स्कूलची स्थापना केली. फिमेल ट्रेनिंग कॉलेज, शहरातील गर्ल्स स्कूल तसेच नवसरी आणि पाटण येथील गर्ल्स स्कूलमधील मुलींसाठी स्वतंत्र म्युझिक स्कूल चालविले जात होते. सामाजिक क्षेत्रातील कार्याबाबत जागरूक व सजग नागरिक तयार करण्याच्या उद्देशाने सयाजीरावांनी दिलेल्या १६ एप्रिल १९३५ च्या आदेशानुसार बडोद्यात गर्ल्स गाईडची चळवळ सुरू केली. बडोद्याच्या फिमेल ट्रेनिंग कॉलेजमध्ये गर्ल्स गाईडची संकल्पना सर्वप्रथम राबवण्यात आली. १९३९-४० मध्ये बडोद्यात १,५३० गर्ल्स गाईड्स कार्यरत होत्या.

## महाराणी चिमणाबाई

स्त्रीशिक्षणाच्या दिशेने वाटचाल करताना सयाजीरावांनी महाराणी चिमणाबाईंपासून सुरुवात केली. विवाहापर्यंत निरक्षर असणाऱ्या चिमणाबाईंना शिक्षण देऊन सयाजीरावांनी त्यांच्यातील परिपूर्ण स्त्री घडवली. महाराजांच्या 'वाटेने' मार्गक्रमण करत स्त्री-उन्नतीसाठी कार्यरत राहिलेल्या महाराणी चिमणाबाईंना ३ ऑगस्ट १८९२ ला ब्रिटिश महाराणींनी 'Emperial Order of the Crown of India' या किताबाने सन्मानित करण्यात आले. १९०६ मध्ये कलकत्ता येथील

राष्ट्रीय कॉंग्रेसच्या दुसऱ्या हिंदी औद्योगिक परिषदेतील महिला विभागाच्या अध्यक्षा म्हणून चिमणाबाईंची निवड करण्यात आली होती. याच अधिवेशनाच्या सर्वसाधारण विभागाचे अध्यक्ष सयाजीराव महाराज होते. राजा आणि राणी पती-पत्नींना एकाच वेळी एखाद्या महत्त्वाच्या राष्ट्रीय परिषदेचे अध्यक्षपद सन्मानाने मिळण्याचा भारतातील हा एकमेव प्रसंग असावा.

१९११ मध्ये महाराणी चिमणाबाईंनी भारतीय स्त्रियांच्या स्थितीची जगातील ७ खंडातील २९ देशांमधील स्त्रियांच्या स्थितीशी तुलना करणारा 'The Position of Women in Indian Life' हा महत्त्वपूर्ण ग्रंथ लिहिला. हा ग्रंथ भारतीय स्त्रियांना अर्पण केला असून तो लंडनमधून प्रकाशित झाला होता. हा ग्रंथ म्हणजे महाराजांच्या प्रेरणेने विकसित झालेल्या चिमणाबाईंच्या व्यक्तिमत्त्वाचा परमोच्च बिंदू होता. परदेश प्रवासावेळी महाराज आपल्यासोबत चिमणाबाईंनाही घेऊन जात. १९१४ मध्ये महाराणींनी स्वतःहून पडदा पद्धतीचा त्याग केला. चिमणाबाई पडदा पद्धतीचा त्याग करणाऱ्या राजघराण्यातील पहिल्या महिला होत्या. १९२७ मध्ये पुण्यात भरलेल्या पहिल्या अखिल भारतीय महिला परिषदेचे अध्यक्षपद त्यांना सन्मानपूर्वक देण्यात आले. हे अध्यक्षपद जसे चिमणाबाईंच्या कामाचा गौरव करणारे होते त्यापेक्षाही अधिक महाराजांनी महिलांविषयक केलेल्या सुधारणा, कायदे आणि उपक्रम यांच्या प्रेरणेतूनही होते.

## इंदिराराजेंचा मराठा-आदिवासी विवाह

महाराज प्रत्येक सुधारणेची सुरुवात स्वतःपासून आणि राजवाड्यापासून करत होते. याचे उदाहरण म्हणजे त्यांची कन्या इंदिराराजे यांनी स्वतः ठरवून केलेला मराठा-आदिवासी विवाह होय. महाराष्ट्राला शाहू महाराजांच्या प्रेरणेने शाहू महाराजांच्या जनक घराण्यातील चुलत बहिणीचा इंदूरच्या होळकरांबरोबर १९२४ मध्ये झालेला मराठा-धनगर हा आंतरजातीय विवाह माहीत आहे. परंतु शाहू महाराजांना या आंतरजातीय विवाहाची प्रेरणा देणारा त्याअगोदर ११ वर्षे १९१३ ला झालेला राजघराण्यातील पहिला मराठा-आदिवासी आंतरजमातीय विवाह महाराष्ट्राला माहीत नाही. असा विवाह सयाजीरावांची कन्या इंदिराराजे यांनी कूचबिहार या आदिवासी संस्थानातील राजकुमार जितेंद्र नारायण यांच्याशी स्वतःच ठरवून केला होता.

## संस्थात्मक कार्य

स्त्रियांच्या सर्वांगीण उन्नतीसाठी सयाजीरावांनी महाराणी चिमणाबाईंच्या नेतृत्वाखाली बडोद्यात विविध संस्था सुरू केल्या. स्त्रियांचा सामाजिक संपर्क वाढावा यासाठी ३ मार्च १९०३ रोजी ‘चिमणाबाई लेडीज क्लब’ची स्थापना करण्यात आली. अशा प्रकारचा भारतातील हा पहिला क्लब होता. या क्लबच्या माध्यमातून विविध क्षेत्रातील बुद्धिमान स्त्रियांमध्ये होणारा परस्पर संवाद हा बडोद्यातील स्त्रीशिक्षणाच्या प्रगतीचा महत्त्वाचा टप्पा होता. मध्यमवर्गीय कुटुंबातील स्त्रियांचा दृष्टिकोन

व्यापक व्हावा, त्यांचा सामाजिक अवकाश विस्तारून त्यांच्या स्वतंत्र व्यक्तिमत्त्वाची जडणघडण व्हावी या उद्देशाने २० फेब्रुवारी १९१५ ला ‘श्री महाराणी चिमणाबाई स्त्री समाजा’ची स्थापना करण्यात आली. श्री. मनोरमा दिघे यांच्या नेतृत्वाखाली १९१५ साली जुम्मादादा व्यायाम मंदिरात ‘कन्या आरोग्य मंदिरा’ची स्थापना करण्यात आली. महिलांसाठी स्वतंत्र व्यायामशाळा सुरू करणारे भारतातील पहिले बडोदा संस्थान सयाजीरावांच्या आधुनिक विचारांची साक्ष देते.

स्त्रियांना स्वावलंबी व त्यांचा व्यावसायिक दृष्टिकोन व्यापक करण्यासाठी १९१७ मध्ये ‘स्त्री उद्योगालया’ची स्थापना करण्यात आली. या उद्योगालयाने महिलांविषयीचे विविध उद्योग आणि तांत्रिक शिक्षणाच्या विविध अभ्यासक्रमाची सोय करून दिली. स्त्री उद्योगालयाने भारतातील स्त्रियांचा पहिला आनंदमेळा भरविला. १९३८ मध्ये उद्योगालयाच्या इमारतीसाठी सर सयाजीराव डायमंड ज्युबिली फंडातून ३०,००० रुपये देणगी देण्यात आली. १९३९ मध्ये स्त्री उद्योगालयाने डिप्लोमा परीक्षेसाठी येणाऱ्या खेड्यातील स्त्रियांसाठी वसतिगृहाची सोय केली. दरवर्षी जवळजवळ २०० स्त्रिया या उद्योगालयात प्रवेश घेत असत. स्त्रियांना प्रोत्साहन देण्यासाठी व त्यांनी तयार केलेल्या विविध वस्तू जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहोचविण्यासाठी महाराजांनी अशा वस्तूंच्या प्रदर्शनांचे आयोजनही केले होते.

महाराणी हायस्कूलच्या मुख्याध्यापिका श्रीमती झवेरी यांनी ८ एप्रिल १९२१ रोजी भगिनी समाजाची स्थापना केली. १९२७ साली बडोद्यात जेव्हा पुराने मोठी हानी झाली, तेव्हा भगिनी समाजाने पूरग्रस्तांच्या मदतीसाठी मोठी रक्कम जमा करून पूरग्रस्त गरिबांच्या घराघरात जाऊन ती मदत पोहोचविली. १९२३ मध्ये बडोदा कॉलेजच्या एका खोलीत 'महाराणी चिमणाबाई महिला पाठशाळे'ची स्थापना करण्यात आली. या संस्थेने तब्बल ४० वर्षे स्त्रियांना देशी भाषेत शिक्षण देण्याचे कार्य केले. या पाठशाळेत तत्त्वज्ञान, समाजशास्त्र, मानसशास्त्र, जीवशास्त्र, आरोग्यशास्त्र इ. स्त्रियांना उपयुक्त ठरणारे महत्त्वाचे विषय देशी भाषांतून शिकविले जात.

सयाजीरावांनी आपल्या आरोग्यविषयक धोरणात स्त्रियांच्या आरोग्यविषयक सुधारणांना अग्रक्रम दिला होता. गरीब स्त्रियांना प्रसूतीवेळी मदत करण्याच्या उद्देशाने १९०९ मध्ये आपल्या प्रथम पत्नींच्या स्मरणार्थ महाराजांनी ५०,००० रु. देणगी दिली. ही देणगी आजच्या रुपयाच्या मूल्यात१२ कोटी ५० लाख रुपयांहून अधिक भरते. पुढे १९२३ मध्ये गर्भवती स्त्रियांसाठी 'महाराणी चिमणाबाई प्रसूतिगृह व शिशुकल्याण संस्थेची स्थापना केली. या संस्थेने गर्भवती स्त्रियांना प्रसूतीसाठी सुईणींचा सल्ला घेण्याऐवजी हॉस्पिटलमध्ये येण्यासाठी उत्तेजन दिले. या संस्थेने प्रसूतीदरम्यान स्त्रिया आणि बालकांच्या होणाऱ्या मृत्यूचे प्रमाण कमी करण्यात लक्षणीय यश मिळविले.

## बालसप्ताह

आई व बालकाचे आरोग्य उत्तम असणे राष्ट्राच्या विकासातील अत्यंत महत्त्वपूर्ण बाब असल्याने सयाजीरावांनी माता व बालकांच्या आरोग्यासाठी जे जे करता येईल ते सर्व केले. याचे उत्तम उदाहरण म्हणजे माता आणि बाल आरोग्य संवर्धनाच्या दृष्टिकोनातून बडोद्यात झालेला 'बाल सप्ताह'(Baby Weak) होय. भारतातील पहिल्या 'बाल सप्ताह' आयोजनाचे श्रेय बडोदा संस्थानला जाते. १ ते ६ फेब्रुवारी १९२४ दरम्यान बडोद्यात आयोजित केलेल्या बाल सप्ताहामध्ये मातेचे आरोग्य व बालकांचे संगोपन या विषयाशी संबंधित निबंध स्पर्धा तसेच 'महिला आणि बालकल्याण' या विषयावरील पोस्टर प्रदर्शन भरविले होते.

## महिला बचत गट

आर्थिक सबलीकरणाबरोबर महिलांना काटकसरीची सवय लागून महिलांची उन्नती व्हावी यासाठी सयाजीरावांनी १९३१ मध्ये महिलांच्या काटकसर संस्थांची (म्हणजेच बचत गटांची) स्थापना केली. भारतातील बचत गट चळवळीचा हा आरंभ बिंदू होता. स्थापनेच्या वर्षी संपूर्ण बडोदा संस्थानात ११ तर १९३८-३९ मध्ये ५५ महिला काटकसर संस्था कार्यरत होत्या. बांग्लादेशातील अर्थशास्त्रज्ञ आणि बचत गट चळवळीच्या कामाची दखल घेऊन २००६ मध्ये ज्यांना नोबेल पुरस्कार दिला गेला त्या महंमद युनूस यांच्या अगोदर ५० वर्षे सयाजीरावांनी बडोद्यात हा प्रयोग यशस्वी केला होता.

महिलांनी आपल्या बंदिस्त जीवनक्रमातून थोडासा वेळ काढून करमणूक, व्यायाम आणि खेळ यात आपला वेळ घालवावा यासाठी १४ फेब्रुवारी १९३७ ला 'महिला क्रीडा मंडळ' सुरू करण्यात आले. या क्रीडा मंडळाच्या माध्यमातून स्त्रियांना योगा, लाठी, लेझीम यासारख्या मैदानी खेळांचे प्रशिक्षण दिले जात असे.

## स्त्रीविषयक कायदे

रूढी परंपरांच्या विळख्यात अडकलेल्या स्त्रियांना मुक्त करण्यासाठी सयाजीरावांनी कायदेशीर तरतुदींचा मार्ग स्वीकारला. भारतीय समाजपरंपरेने स्त्रियांना नाकारलेले अनेक अधिकार सयाजीरावांनी कायद्यांच्या माध्यमातून आपल्या संस्थानातील स्त्रियांना बहाल केले. पतीच्या मृत्यूनंतरही स्त्रियांना आपले जीवन सामान्य स्त्रीप्रमाणे जगता यावे यासाठी सयाजीरावांनी १९०१ मध्ये ब्रिटिश भारतातील विधवा विवाह कायद्याच्या धर्तीवर बडोद्यात विधवा पुनर्विवाहाचा कायदा केला.

फुलेंनी १८८४ ला मुंबई सरकारकडे बालविवाह प्रतिबंधक कायदा करून बालविवाह लावणाऱ्या दोन्ही पक्षातील पालकांकडून दंड वसूल करावा व तो दंड बहुजनांच्या शिक्षणासाठी खर्च करण्याची मागणी केली होती. ही मागणी करत असतानाच अशा प्रकारचा कायदा करण्याची दृष्टी संपूर्ण भारतात फक्त सयाजीरावांकडे असल्याचे मत त्यांनी नोंदवले

होते. सयाजीरावांनी १९०४ मध्ये फुलेंच्या मागणीला सुसंगत असा 'बालविवाह प्रतिबंधक कायदा' केला. या कायद्यात महाराजांनी फुलेंच्या पुढे जाऊन वधू-वर पक्षाबरोबर बालविवाह लावणाऱ्या भटजीलासुद्धा दंड आणि शिक्षेची तरतूद केली. सायाजीरावांचे हे धोरण प्रश्नाच्या मुळापर्यंत जाऊन त्याच्या सोडवणुकीसाठी किती कठोर पाऊल उचलता येऊ शकते याची साक्ष देणारे आहे.

भारतीय महिलांच्या उत्कर्षाचा मार्ग असणाऱ्या परंतु त्यासाठी महिलांबरोबरच स्वत: बाबासाहेबांनाही संघर्ष कराव्या लागलेल्या हिंदू कोड बिलातील सर्व ६ कायदे सयाजीरावांनी १९०५ ते १९३३ दरम्यान बडोद्यात लागू केले होते. भारतीय राज्यघटनेत या विषयाची चर्चा सुरू होण्याअगोदर ४५ वर्षे बडोद्यात हिंदू कोड बिलाची अंमलबजावणी सुरू झाली होती. तर उर्वरित भारतातील हिंदू महिलांना जे हक्क मिळायला ६०-७० वर्षे संघर्ष करावा लागला ते हक्क बडोद्यातील स्त्रियांना उर्वरित भारतातील हिंदू स्त्रियांच्या अगोदर ११५ वर्षे मिळाले होते.

बडोदा संस्थानात हिंदू विवाह कायदा १९०५ मध्ये करण्यात आला. या कायद्यात हिंदू लग्नाच्या मूलतत्त्वांची व्याख्या करून, कायदेशीर लग्नाच्या अवश्य गोष्टी, स्त्री-पुरुषांचे परस्पर हक्क, त्यांचे मिळकतीवरील अधिकार, एकमेकांबद्दलची जबाबदारी व लग्न संबंधाची अविछीन्नता या सर्व गोष्टी निश्चित करण्यात आल्या. हिंदू विवाह कायदा करणारे बडोदा हे ब्रिटिश भारत आणि ५६५ संस्थानातील पहिले संस्थान होते.

बाळाच्या जन्मावेळी दाई हजर असण्याचे महत्त्व लोकांना पटवून देणे आणि दाईप्रती असणारा निष्काळजीपणा व केले जाणारे दुर्लक्ष यावर मात करण्यासाठी १६ ऑक्टोबर १९१९ रोजी बडोद्यात 'दाई कायदा' लागू करण्यात आला. या कायद्यानुसार परिचारिका प्रशिक्षण घेतल्याशिवाय कोणत्याही महिलेला सुइणीचे काम करण्याची परवानगी नव्हती. परिचारिका प्रशिक्षण पूर्ण करून एखाद्या रुग्णालयात कामाचा अनुभव घेतल्यानंतरच त्या स्त्रीला परिचारिकेचा परवाना दिला जात होता.

१९३१ साली बडोद्यात हिंदू घटस्फोट कायदा अमलात आला. कोर्टात नोंदणी केल्याशिवाय घटस्फोट मान्य केला जाणार नाही अशी या कायद्यात तरतूद होती. या कायद्यानुसार कोणत्याही स्त्रीच्या पतीचा मृत्यू होऊन ७ वर्षे झाली असतील, त्याने संन्यास घेतला असेल, धर्मांतर केले असेल किंवा तो नपुंसक असेल तर त्या स्त्रीला अशा लग्नातून घटस्फोट मागण्याचा अधिकार होता. या मुख्य कलमांबरोबरच पत्नीच्या व तिच्या मुलाच्या उदरनिर्वाह आणि संगोपनाची व्यवस्था करण्याबद्दलचे नियमही या कायद्यात करण्यात आले होते.

१९३२ मध्ये सयाजीरावांनी बडोद्यात 'माता कल्याण कायदा' अमलात आणला. १९२९ च्या 'बॉम्बे माता कल्याण कायद्या'च्या धर्तीवर हा कायदा करण्यात आला होता. कारखान्यात काम करणाऱ्या महिलांच्या प्रसूतीच्या काही काळ आधी व काही काळ नंतर कारखान्यातील त्यांच्या रोजगाराच्या नियमनाची

आणि प्रसूतीदरम्यान त्यांना आर्थिक साहाय्य देण्याची तरतूद या कायद्यात करण्यात आली.

वारसा हक्काने हिंदू महिलांना संपत्तीत हिस्सा देणारा 'हिंदू स्त्रियांचा संपत्तीतील हक्क कायदा' १९३३ साली महाराजांनी बडोद्यात लागू केला. असा कायदा करणारे बडोदा हे भारतातील पहिले संस्थान होते. मृत मुलींच्या मुलांना जिवंत मुलींबरोबर संपत्तीत वाटा देण्याची सयाजीरावांनी या कायद्यात केलेली तरतूद स्वतंत्र भारतात ७० वर्षांनंतरदेखील लागू होऊ शकली नाही यातून सयाजीरावांच्या या कायद्याचे क्रांतिकारकत्व सिद्ध होते.

स्त्री सक्षमीकरणासाठीच्या प्रयत्नांबरोबरच महाराजांनी सरकारी नोकरीत स्त्रियांना रुजू करून घेण्याचा हुकूम काढला. त्याचबरोबर या हकुमात नोकरीतील स्त्रियांशी सभ्यतेने वागावे असा नियमही करण्यात आला. विसाव्या शतकाच्या सुरुवातीपर्यंत जगभरातील विविध देशांतील स्त्रियांना मतदानाचा हक्क नाकारला होता. परंतु बडोदा संस्थानातील स्त्रियांना सयाजीरावांनी कोणत्याही मागणीशिवाय मतदानाचा अधिकार दिला. सयाजीराव हे स्त्रियांना मतदानाचा अधिकार देणारे पहिले राज्यकर्ते ठरतात. त्याचबरोबर लोकल बोर्डस् आणि म्युनिसिपालिटीमध्ये कायदेशीर सदस्यत्व तसेच लेजिस्लेटिव्ह कौन्सिलमध्येही सदस्यत्व देणारे सयाजीराव पहिले शासनकर्ते ठरतात.

## स्त्रीविषयक कार्याला मदत

महाराजांनी फक्त आपले संस्थान आपल्या सुधारणांचे कार्यक्षेत्र म्हणून स्वीकारले नव्हते; तर गंभीरपणे हाती घेतलेल्या कोणत्याही विचारधारेच्या व्यक्ती अगर संस्थांच्या सुधारणावादी कार्याच्या पाठीशी महाराजांनी आपली आर्थिक आणि नैतिक ताकद उभी केली असल्याचे शेकडो पुरावे बडोदा दफ्तरात उपलब्ध आहेत. सयाजीरावांनी १९०९ साली हिंदू स्त्रियांच्या शिक्षणासाठी न्यायमूर्ती चंदावरकरांना १ लाख रुपयांची आर्थिक मदत केली. १९१४ मध्ये दिल्लीच्या लेडी हार्डिंग्ज स्त्री वैद्य विद्यालयास १ लाख रुपयांचे आर्थिक साहाय्य केले. १९१६ ला दिल्लीतील लेडी हार्डिंग्ज हॉस्पिटलला ६२,००० रु. दिले. महाराजांनी भारतातील विविध संस्था आणि व्यक्तींच्या स्त्रीविषयक कार्याला केलेली ढोबळ मदत ३ लाख ३१ हजार ५०० रु. इतकी होती. आजच्या रुपयाच्या मूल्यात ही रक्कम सुमारे ८१ कोटी ३२ लाख रु. हून अधिक भरते.

महाराजांनी ज्या ज्या क्षेत्रात काम केले त्या त्या क्षेत्रात ‘पथदर्शक’ आदर्श निर्माण केले. आपण जेव्हा फुले समग्र वाङ्मय समोर ठेवून महाराजांच्या कामाचा विचार करतो तेव्हा फुलेंनी सुधारणांच्या ज्या दिशा सूचित केल्या होत्या त्या दिशेने जात असताना महाराजांनी फुले विचाराच्या पलीकडे जाऊन काम केले असल्याचे शेकडो पुरावे मिळतात. म्हणूनच पुरोगामी महाराष्ट्राचा आरंभबिंदू मानल्या गेलेल्या फुलेंनीही

आपल्या बैठकीच्या खोलीत सयाजीरावांचा फोटो लावून महाराजांना सलाम का केला होता याचे उत्तर मिळते. फुल्यांनी सयाजीरावांचा फोटो जेव्हा आपल्या बैठकीच्या खोलीत लावला तेव्हा 'सयाजीयुगा'चा नुकताच आरंभ झाला होता. फुले आणखी १०-२० वर्षे जगले असते तर आनंदाने बेभान होऊन त्यांनी महाराजांना 'वैचारिक मुजरा' घातला असता. यावरून 'सयाजीराव हे 'आधुनिक' भारताचे आणि 'पुरोगामी' महाराष्ट्राचे सूत्रधार होते' हा सिद्धांत प्रस्थापित होतो.

●●●

## महाराजा सयाजीराव ज्ञानमाला नामसूची

१) शिवसृष्टीचे निर्माते - सागर मोहिते
२) कृतीशील सत्यशोधक - दिनेश पाटील
३) राजर्षी शाहू - दिनेश पाटील
४) एक 'क्रांतीपर्व' - आंबेडकर - दिनेश पाटील
५) दानशूर महाराजा सयाजीराव - डॉ. राजेंद्र मगर
६) दामोदर सावळाराम यंदे - राजश्री कदम
७) खासेराव जाधव - शिवानी घोंगडे
८) कृष्णराव अर्जुन केळूसकर - सुरक्षा घोंगडे
९) सावित्रीबाई फुले - शिवानी घोंगडे
१०) विठ्ठल रामजी शिंदे - पवन साठे
११) गंगारामभाऊ म्हस्के - दिनेश पाटील
१२) रियासतकार गो. स. सरदेसाई - दिनेश पाटील
१३) योगी अरविंद घोष - डॉ. राजेंद्र मगर
१४) महाराणी चिमणाबाई सयाजीराव गायकवाड - सुरक्षा घोंगडे
१५) कर्मवीर भाऊराव पाटील - शिवानी घोंगडे
१६) बडोद्यातील वेदोक्त - राजश्री कदम
१७) धर्म खाते - सुरक्षा घोंगडे
१८) हिंदू पुरोहित कायदा - देवदत्त कदम
१९) तुलनात्मक धर्मचिंतक - देवदत्त कदम
२०) जातविषयक चिंतन - सुरक्षा घोंगडे
२१) इंदिराराजेंचा क्रांतिकारक विवाह - देवदत्त कदम
२२) हिंदू कोड बिल - देवदत्त कदम
२३) दुसरी जागतिक सर्वधर्म परिषद - डॉ. राजेंद्र मगर
२४) सक्तीचा प्राथमिक शिक्षण कायदा - राजश्री कदम
२५) स्त्रीविषयक कार्य - शिवानी घोंगडे
२६) मराठी भाषा, साहित्य व संस्कृती - निलोफर मुजावर
२७) संस्कृत शिक्षण - निलोफर मुजावर
२८) धर्मानंद कोसंबी - निलोफर मुजावर
२९) बौद्ध धर्म - सौरभ गायकवाड
३०) मराठी पत्रकरीता - सौरभ गायकवाड
३१) नानासाहेब शिंदे - देवदत्त कदम
३२) महात्मा गांधी - दिनेश पाटील
३३) श्रीधर व्यंकटेश केतकर - सौरभ गायकवाड
३४) प्राच्यविद्या - सौरभ गायकवाड
३५) आरोग्य आणि व्यायामविषयक कार्य - शिवानी घोंगडे
३६) अखिल भारतीय मराठा शिक्षण परिषद - सत्यनारायण आरडे
३७) भारताचा स्वातंत्र्यलढा - राहुल वणवे
३८) महाराजा सयाजीराव आणि जगप्रवास - दिनेश पाटील
३९) निर्व्यसनी, चारित्र्यवान, सार्वभौम राजा - बाबा भांड
४०) ललितकला - धारा भांड मालुंजकर

४१) राजा रवी वर्मा - धारा भांड मालुंजकर
४२) बालगंधर्व - धारा भांड मालुंजकर
४३) दादासाहेब फाळके
- धारा भांड मालुंजकर
४४) बडोद्यातल्या वास्तू
- धारा भांड मालुंजकर
४५) संगीत शिक्षण - धारा भांड मालुंजकर
४६) बडोद्याचे कलाभवन
- सौरभ गायकवाड
४७) बँक ऑफ बडोदा - देवदत्त कदम
४८) दुष्काळ दौऱ्याच्या नोंदी
- दिनेश पाटील
४९) शेतीविकास - देवदत्त कदम
५०) उद्योग विकास - सौरभ गायकवाड
५१) सहकार विकास - राहुल वणवे
५२) जलनियोजन (जलसंवर्धन)
- डॉ. राजेंद्र मगर
५३) पूरनिवारण - डॉ. राजेंद्र मगर
५४) सत्यशोधक धामणस्कर
- सत्यनारायण आरडे
५५) बडोद्याचा लक्ष्मीविलास पॅलेस
- पवन साठे
५६) लोकपाळ राजा सयाजीराव : चरित्र
- बाबा भांड
५७) यशवंतराव चव्हाण - दिनेश पाटील
५८) धर्म विचार - बाबा भांड
५९) राजाराम शास्त्री भागवत - बाबा भांड
६०) छत्रपती शाहू - बाबा भांड
६१) महाराजा सयाजीराव 'प्रजासत्ताक' राजा - अनिल वकटे
६२) महात्मा फुले, मामा परमानंद आणि सयाजीरावांना पत्रे - बाबा भांड
६३) बहुजनांच्या शिक्षणासाठी मदत
- बाबा भांड
६४) आरक्षण : सयाजीरावांचे आणि शाहुंचे - दिनेश पाटील
६५) दानशूर महाराजा सयाजीराव आणि जमशेटजी टाटा - डॉ. राजेंद्र मगर

आपणास वरील पैकी काही ई-बुक हवे असल्यास संपर्क करावा

बाबा भांड - ९८८१७४५६०४, दिनेश पाटील -९६२३८५८१०४,
डॉ. राजेंद्र मगर -९४२०३७८८५०, धारा भांड मालुंजकर - ९८८१७४५६०८
महेश मोधे - ८७८८२०८९९०

## महाराजा सयाजीराव प्रकाशित साहित्य :

❒ **महाराष्ट्र शासन : २५ खंडातील ६२ ग्रंथ = २६६४२ पृष्ठे**

**<u>मराठी :</u>**

- भाषण संग्रह : २ ग्रंथ
- पत्रसंग्रह : ३ ग्रंथ
- गौरवगाथा : १ ग्रंथ
- सयाजीराव लेखन : २ ग्रंथ
- सुप्रशासन : २ ग्रंथ
- जगप्रवास : ३ ग्रंथ
- शिक्षण सुधारणा : १ ग्रंथ
- आठवणी व लेख : ३ ग्रंथ
- सयाजीराव चरित्रे : ५ ग्रंथ
- सुधारणा : १० ग्रंथ = एकूण ३२ ग्रंथ

**<u>English</u>**

- Spechess & Adresses : 2 Books
- Letters : 4 Books
- Writings of Sayajirao : 2 Books
- Administration : 1 Books
- World Tour Reports : 3 Books
- Education Reforms : 3 Books
- Biographies : 5 Books
- Total English Books : 20

**<u>हिन्दी :</u>**

- सयाजीराव का लेखन : १
- स्वतंत्र्य युद्ध के समर्थक : १
- सयाजीराव जीवनी : २
- भाषण संग्रह : २
- पत्र संग्रह : ३
- गौरवगाथा : १ = १० ग्रंथ

**साहित्य संस्कृती मंडळ आणि अकादमी : ५ ग्रंथ**

- महाराजा सयाजीराव ट्रस्ट : ३० ग्रंथ
- साकेत प्रकाशन प्रा. लि. औरंगाबाद

कथा, कादंबरी, चरित्र्य, इतिहास, बोधकथा, किशोर कादंबरी, फुले, आंबेडकर, लिखित - संपादित १३ ग्रंथ

---

● महाराष्ट्र शासन प्रकाशित ग्रंथ शासकीय ग्रंथ गार आणि अधिकृत विक्रेते साकेत प्रकाशन यांचेकडे उपलब्ध.

● सयाजीराव ट्रस्ट, शासन व साकेत प्रकाशनाचे महाराजा सयाजीरावांचे वरील ग्रंथ उपलब्ध :

---

साकेत प्रकाशन प्रा. लि.,११५ महात्मा गांधीनगर, औरंगाबाद ४३१००५
मो. : ९८८१७४५६०५, ९८८१७४५६०४

●●●

## महाराजा सयाजीराव ज्ञानमाला निर्मितीमागील भूमिका

महाराजा सयाजीराव गायकवाड हे फक्त आधुनिक भारतातील सगळ्यात प्रागतिक राजे होते असे नाही तर भारतासारख्या बहुसांस्कृतिक देशाचे 'बौद्धिक नेतृत्व'च ते करत होते. धर्म, जात, तत्त्वज्ञान, शिक्षण, दातृत्त्व, संशोधन, शेती, उद्योग, आरोग्य, क्रीडा, साहित्य, संस्कृती, ललित कला, प्राच्यविद्या, पुरातत्त्व, आंतरराष्ट्रीय संबंध, स्वातंत्र्यलढा इ. मानवी समाजाच्या सर्व अंगांना कवेत घेणाऱ्या क्षेत्रात त्यांनी निर्माण केलेले मानदंड आजही भारतासाठी आदर्श आहेत. त्यामुळे ते आधुनिक भारताचे निर्माते आणि म्हणूनच खरेखुरे 'महानायक' सुद्धा आहेत.

महापुरुषांचे चिंतन हे फक्त इतिहासाच्या स्वप्नरंजनासाठी किंवा इतिहासाचा पोकळ अभिमान बाळगण्यासाठी करायचे नसते. आपल्या समकालीन जगण्यातील समस्यांची उत्तरे शोधण्यासाठी, आपला जीवनसंघर्ष सकारात्मक करण्यासाठीसुद्धा या महापुरुषांचे पुनर्वाचन आवश्यक असते. इतिहास जितका वस्तुनिष्ठपणे आपण वर्तमानाशी जोडू तितका आपल्या समाजाचा भविष्यवेध आपल्याला अचूकपणे घेता येईल.

महाराजा सयाजीरावांचा 'उदोउदो' करण्यासाठी महाराजा सयाजीराव ज्ञानमालेची निर्मिती केलेली नाही. आजच्या आपल्या धार्मिक आणि जातीय संघर्षावर, शेती-उद्योगातील संकटांवर मात करण्यासाठी तसेच समाज म्हणून आपल्यातील 'विसंवाद' कमी करून 'सुसंवाद' वाढवण्याच्या व्यापक भूमिकेतून ही महाराजा सयाजीराव ज्ञानमाला आकाराला आली. या निमित्ताने आपला 'जोडून' वाचण्याची आणि त्यातून संवादाचे पूल उभारण्याची प्रेरणा सर्वांना मिळेल एवढे मात्र नक्की.

पहिल्या टप्प्यात साठ ई-बुक झाले आहेत.

**बाबा भांड**
सचिव

**दिनेश पाटील**
संपादक
महाराजा सयाजीराव ज्ञानमाला

**महाराजा सयाजीराव गायकवाड संशोधन व प्रशिक्षण संस्था**
११५, म. गांधीनगर, स्टेशन रोड,
औरंगाबाद - ४३१ ००५
मो. - ९८८१७४५६०४
ई-मेल : sayajiraogsps@gmail.com